दैनिक साम्ययोग—

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पं.

अंक : १०३ ) वर्धा, बुधवार ता. १५ जुलई १९६४ (मूल्य ५ न.पं.



## मने जोडणारा मनीषी

सर्व धर्म हरीचे पाय, ही भावना विनोबांच्या चित्तात दृढमूल झालेली आहे. स्वामी रामकृष्ण परमहंसांनी त्या त्या धर्म भावनांनी भावित होऊन ईश्वराची आराधना केली आणि त्यांनी आपल्या स्वानुभवाने सिद्ध करून दाखविले कीं मूळ ईश्वर अेकच आहे आणि उपासना पंथ भिन्न असले तरी ते सर्व ईश्वराकडेच घेऊन जाणारे आहेत.

विनोबांनी सुद्धा आपल्या सायंकाळच्या प्रार्थनेत प्रत्येक धर्मातील अेकअेक मंत्र घेऊन सर्व धर्म समन्वयाचे उदाहरण घालून दिले.

मानवाची येथून तेथून जात अेकच आहे आणि सर्वांचा धर्म मानवधर्म आहे; ही विनोबांची श्रद्धा आहे. परंतु ह्या भूमिकेवर येण्यासाठी आजच्या पंथ व धर्मरूढयात फसलेल्या मानवाला प्रथम सर्व धर्मांचे ठोक दर्शन झाले पाहिजे म्हणजे परस्पराबद्दलची भीति किंवा गैरसमज दूर होतील व सर्व अेकमेकाला समजून घेतील. आणि त्यामुळे अशी अेक वेळ येईल की मराठी माणूस ज्ञानदेव, अेकनाथ, तुकाराम ह्या निरनिराळ्या संतांची भजने जशी सारख्याच आवडीने वाचतो. किंवा महाराष्ट्रातील माणूस तुलसीदास, शंकराचार्य, बुद्ध ह्यांच्या बद्दल आदर बाळगतो. त्याचप्रमाणे तो भगवान येशू, पगंबर महंमद, गुरु नानक, ताओ, महावीर ह्या सर्वांबद्दल बाळगील आणि जगातील लोकहि राम, कृष्ण, रुद्रविष्णू ह्यांच्याकडे आदराने व प्रेमाने पाहतील. जगातील सर्व मानवांना जोडण्याची ही प्रक्रिया सुरू होण्यासाठी विनोबांनी महाराष्ट्रातील संतांच्या भजनांचे वेच्यांचे संपादन केले, शंकराचार्यांच्या शिकवणुकीचे सार लोकासमोर यावे म्हणून गुरुबोध हा ग्रंथ तयार केला. कुराण सार तयार करून इस्लाम धर्माचा परिचय जगाला घडविला, 'धम्मपद' ह्या पाली बौद्ध धर्मग्रंथाचे सुरस भाषांतर केले. आता ते बायबलबाबत चिंतन करीत आहेत आणि लवकरच बायबलाची शिकवण जगासमोर मांडतील.

तेव्हा लोकांच्या हृदयाला जोडण्याची, जगातील सर्व नीतितत्व, धर्मग्रंथ व ईश्वरी पुरुषाबद्दल समान आदराची भावना निर्माण करण्याची त्यांची धडपड चालली आहे. आणि ह्यातूनच नवा मानवधर्म जन्माला येईल अशी त्यामुळे आशा वाटू लागली आहे.

भूदान पदयात्रेत असतांना त्यांनी हे सर्व केले. आणि म्हणूनच भूदान व ग्रामदानाचा कार्यक्रम म्हणजे आर्थिक, सामाजिक, राजकीय मूल्य परिवर्तनाचा कार्यक्रम असा त्याचा गौरव जगात होत असला तरी विनोबा मात्र म्हणतात की हा माझा हृदये जोडण्याचा कार्यक्रम आहे. ह्याच भूदान पदयात्रेच्या निमित्ताने १९५२–५३ साली त्यांची पदयात्रा हिमालयाच्या सांनिध्यात सुरु होती. गंगा आणि हिमालय ह्या बाबत विनोबांच्या मनात अत्यंत खोल श्रद्धा आहे. ह्या गंगा हिमालयाच्या प्रदेशात तराईच्या जंगलात पदयात्रा चालू असता विनोबांनी विशेष चिंतन केले. आणि महाराष्ट्रात जसा.

ज्ञानदेव नामदेव नाथ तुकोबा समर्थ ।<br>
ज्ञानी प्रेमी शांत विरागी कर्मरत ॥

हा संतांच्या स्मरणाचा मंत्र म्हटला जातो त्याच धर्तीवर सर्व धर्म स्मरण घडावे म्हणून त्यांनी खालील श्लोक तयार केला.

### सर्व धर्म स्मरण

ॐ तत्सत् श्री नारायण तू<br>
पुरुषोत्तम गुरु तू<br>
सिद्ध बुद्ध तू स्कंध विनायक<br>
सविता पावक तू ।<br>
ब्रह्म मज्द तू यह्व शक्ति तू<br>
ईशूपिता प्रभू तू ।<br>
रुद्र विष्णू तू राम कृष्ण तू<br>
रहीम ताओ तू<br>
वासुदेव गो-विश्व-रूप तू<br>
चिदानंद हरि तू<br>
अद्वितीय तू अकाल निर्भय<br>
आत्मलिंग शिव तूं ॥

आज अनेक ठिकाणी प्रार्थनेत हा श्लोक रूढ झाला आहे. ह्याच श्लोकाचे विवेचन हल्ली परंधाम आश्रमात ते करीत आहेत. ता. ८ जुलैच्या अंकात श्री नारायण तू ह्याबाबतचे विनोबांनी केलेलें विवेचन दिले होते.

ता. ११ जुलैला भरतराम मंदिरात सायंकाळी झालेल्या प्रार्थनोत्तर प्रवचनात त्यांनी 'रुद्र विष्णू तू' ह्यावर दिलेले प्रवचन ह्या अंकात दिले आहे.

—वसंत बोंबटकर

## रुद्र विष्णू तूं

आपण भगवंतांच्या नावांचा विचार करीत आहोत. रहिम ताओ तू हीं नावे काल झाली. आज रुद्र विष्णू तू हीं दोन नावे आपण घेणार आहोत. भगवान रुद्र आहे आणि विष्णूहि तोच आहे. पण तो निरनिराळीं कामे करतो म्हणून नावे वेगवेगळी पडली. जसा माणूस अेकच; पण शेतात काम करतो तेव्हा शेतकरी व शाळेत शिकवितो तेव्हा शिक्षक. शिक्षक शिकवितोहि आणि शेतीत काम करतो म्हणून शेतकरी पण म्हणवितो.

तसेच भगवंताचे अनेक गुण आहेत. अस्वच्छ, अमंगल, घाण हे सर्व काढून टाकण्याचे काम रुद्राचे. रुद्र म्हणजे अमंगल काढणारा. आणि विष्णू मंगल वाढविणारा. आपण शेतात रोपांचीं निंदाई करतो आणि त्यांना माती चढवितो. साफ सफाई करणे हे रुद्र काम व माती चढविणे विष्णू काम. तसेच चित्तात वाईट वासना असतात त्या काढायच्या म्हणजे निरोध करायचा. त्याला शास्त्रात निरोध हे नाव दिले. व चांगल्या वाढवायच्या म्हणजे त्यांचा विकास करायचा. वाईटांचा निरोध, चांगल्यांचा विकास. निरोध रुद्र करणार आणि विकास विष्णू करणार. अेका खात्याचे काम निरोध करण्याचे आहे, व दुसऱ्या खात्याचे काम विकास करण्याचे आहे."

नंतर विनोबांनी मुलांना प्रश्न केला "आपल्या मनात व बाहेर सुद्धा मग हे दोन देव हवेत की नकोत?" मुले म्हणालीं 'होय हवेत'. विनोबा पुढे म्हणाले 'निरोध आणि विकास मिळून काम पूर्ण होणार. घाण काढण्याचे काम रुद्र करणार, फुले लावण्याचे काम विष्णू करणार. भगवान दोन रूपे घेतो. अेक रुद्र अेक विष्णू."

भरत राम मंदिर<br>
परंधाम पवनार

११-७-६४

www.vinoba.in

